महाराष्ट्र शासन

# शासकीय तंत्रनिकेतन,पुणे.

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

विद्यापीठ मार्ग, शिवाजीनगर, पुणे-४११०१६

principal.gppune@dtemaharashtra.gov.in

दूरध्वनी क्र.०२०-२५६७६८१८,२५५५१२००Email:-

दिनांक 05 OCT 2023

जा.क्र.वसति/शातंनिपु/2023/ 4399

## निविदा

**विषय: शासकीय तंत्रनिकेतन,पुणे या संस्थेतील उपहारगृहासाठी (विद्यार्थीनी क्षमता ३५००) सेवा पुरवण्याबाबत अभिव्यक्ती स्वारस्य.**

शासकीय तंत्रनिकेतन,पुणे या संस्थेतील उपहारगृहासाठी (विद्यार्थीनी क्षमता ३५००) सेवा पुरविण्याबाबत अनुभवी कंत्राटदाराकडून अभिव्यक्ती स्वारस्य/निविदा मागविण्यात येत आहे.

निविदेबाबतची सविस्तर माहिती आहे.

**निविदेबाबतची माहिती**

| | |
|---|---|
| ०१. कोऱ्या निविदेची किंमत | :रु.१००/- (नापरतावा) |
| ०२. बिनव्याजी बयाना रक्कम रुपये | :रु.२,०००/- (परतावा) |
| ०३. बिनव्याजी सुरक्षा ठेव रक्कम | :रु.१,००,०००/- |
| ०४. निविदेचा कालावधी: | :दि. ०६ ऑक्टोंबर २०२३ ते दि.१९ ऑक्टोंबर २०२३ |
| ०५. निविदा सादर करावयाची अंतिम तारीख व वेळ | :दि. १९ ऑक्टोंबर २०२३ दु. ३.०० वा |
| ०६. निविदेतील तांत्रिक लिफाफे उघडण्याचीतारीख व वेळ | :दिः १९ ऑक्टोंबर २०२३ दु. ४.०० वा |
| ०७. कोऱ्या निविदा मिळण्याचे व भरलेले अर्ज जमा करणे | :रोखपाल, शासकीय तंत्रनिकेतन,पुणे निविदा सादर करावयाचे कार्यालय |

निविदा दोन प्रपत्रामध्ये (प्रपत्र- अ आणि प्रपत्र-ब) भरून लिफाफा क्रमांक-१(प्रपत्र-अ व कागदपत्रे) व लिफाफा क्रमांक-२ (प्रपत्र ब दरपत्रक) सीलबंद करून लिफाफ्यावर लिफाफा क्रमांक-१ (प्रपत्र- अ व कागदपत्रे) व लिफाफा क्रमांक-२(प्रपत्र-ब) असे नमूद करून सीलबंद लिफाफ्यात टाकावेत व लिफाफ्यावर "शासकीय तंत्रनिकेतन,पुणे या संस्थेच्या मुलांच्या वसतिगृहातील भोजनालयासाठी सेवा पुरवण्याबाबत निविदा" असे नमूद करून सीलबंद लिफाफा संस्थेच्या कार्यालयात विहित कालावधीत सादर करावा. विहित कालावधीत प्राप्त न होणाऱ्या निवेदेचा विचार केला जाणार नाही, तसेच टपालाद्वारे विहित कालावधी नंतर प्राप्त निवेदेचा विचार केला जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

सर्व प्रथम तांत्रिक कागदपत्रांच्या पडताळणीसाठी लिफाफा क्रमांक-१ (प्रपत्र-अ व कागदपत्रे) उघडण्यात येऊन निविदेत नमूद केल्यानुसार आवश्यक कागदपत्रे सादर केली आहेत किंवा कसे याबाबत खात्री करण्यात येईल, आवश्यक कागदपत्रे सादर न केल्याचे आढळून आल्यास अशी निविदा अपात्र ठरविण्यात येईल. जे निविदाधारक उपरोक्त प्रक्रिये दरम्यान उपस्थित राहू इच्छितात त्यांनी वर नमूद केलेल्या ठिकाणी वेळेवर उपस्थित रहावे. लिफाफा क्रमांक-२ (प्रपत्र-ब दरपत्रक) उघडण्यापूर्वी तांत्रिक लिफाफा क्रमांक-१ च्या पडताळणी मध्ये पात्र ठरलेल्या निविदा धारकांची, दर पत्रिकेची नियुक्त समिती मार्फत अर्हता छाननी करण्यात येईल. दोन किंवा अधिक निविदा धारकांचे दर समान असल्यास प्रत्येकाला स्वतंत्रपणे चर्चेसाठी बोलविले जाईल व त्या आधारे अंतिम निर्णय घेतला जाईल. चर्चेद्वारे सुधारित दर निश्चित करण्याचे अधिकार भोजनालय समितीस राहतील.

संबंधित सर्व कागदपत्रे ज्या नावे निविदा सादर केली आहे त्याच नावाने असणे बंधनकारक आहे. तसेच तांत्रिक लिफाफे उघडल्यावर नियुक्त समितीने मागणी केल्यास सर्व मूळ कागदपत्रे तपासणीसाठी उपलब्ध करणे अनिवार्य आहे. निविदा भरण्यापूर्वी निविदा धारकाने भोजनालयाची पाहणी करावी, निविदा धारकास निविदा भरताना काही अडचण असल्यास किंवा काही बाबतीत स्पष्टीकरण आवश्यक असल्यास कुलमंत्री,शासकीय तंत्रनिकेतन,पुणे यांच्याशी संपर्क साधावा.

कोणत्याही क्षणी कोणतेही कारण न देता निविदा प्रक्रिया रद्द करण्याचे अधिकार मा. प्राचार्य शासकीय तंत्रनिकेतन,पुणे यांना राहतील.

Bnde 5/10/2023

(डॉ.विठ्ठल श्री. बांदल)
प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन,पुणे